स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२१ वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● शनिवार, दिनांक २१ मार्च २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ५५ ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# पीडितेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न म्हणजे संघटित गुन्हा! त्यामुळे तुमची नार्को टेस्ट अन् अटक होणंही गरजेचं!!

- पक्षाची बदनामी होत असेल तर गंडे-दोरे, अंगारे-धुपारे करणाऱ्या बाईने राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्ष पदावरूनही पायउतार व्हावे!!
- हा अजित दादा पवार यांचा वारसा आहे, असे अजिबात सांगू नका! कारण त्यांनी कधीच गंडेदोरे आणि भोंदुगिरीला थारा दिला नाही!!
- तुमच्यावर अटकेची टांगती तलवार, आधी जामिनाचं बघा, मग नोटिसा पाठवा'', सुषमा अंधारे यांचा चाकणकरांना खोचक सल्ला

## रूपाली चाकणकर यांच्या नोटीस पाठवण्याच्या वक्तव्यावर अंधारे यांचा सनसनाटी पलटवार

**मुंबई : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी 20 मार्च रोजी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. अशोक खरातप्रकरणी त्यांचं नाव समोर आल्याने राज्यभरातून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत होती. आता याही पुढे जाऊन सुषमा अंधारे यांनी त्यांचा महिला प्रदेशाध्यक्ष पदाचाही राजीनामा घेण्याची मागणी केली आहे. तसंच, त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार असल्याने त्यांनी आता जामीनाचा प्रयत्न करावा, असा खोचक सल्लाही अंधारे यांनी दिला. त्यांनी याबाबत आज सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट केला आहे.**



### तुमच्यावर अटकेची टांगती तलवार; अगोदर ते बघा नंतर नोटीस पाठवा!!

● माध्यमांमध्ये चुकीच्या बातम्या पसरवल्याप्रकरणी कारवाई करणार असल्याचा इशारा रुपाली चाकणकर यांनी दिला होता. त्यावर सुषमा अंधारे यांनी आज प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या, "रुपाली चाकणकरांनी काल राजीनामा दिल्यानंतर त्यांनी नाट्य रंगवण्याचा प्रयत्न केला. त्यावर मला हसायला आलं. कारण, माणसं केविलवाणी धडपड करतात. पण त्याने काही फरक पडणार नाही. मला नोटीस वगैरे पाठवण्याचं राहूद्या. तुमच्या डोक्यावर अटकेची टांगती तलवार आहे. अगोदर ते पहा नंतर नोटीस पाठवा."

### चाकणकरांनी पीडितेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला!

● दरम्यान, अशोक खरातच्या वैयक्तिक आयुष्याबाबत मला माहिती नव्हतं. समाज माध्यमांवर प्रसारित झालेले फोटो हे काही वर्षांपूर्वीचे आहेत, असा दावा रुपाली चाकणकर यांनी केला. त्यावर सुषमा अंधारे म्हणाल्या, "अशोक खरातविषयीच्या सर्व गोष्टींना रुपाली चाकणकर अवगत होत्या. तुम्हाला एक वर्षांपासून कल्पना होती. तुम्ही पीडितेचा आवाज दाबायचा प्रयत्न केला. तुम्ही संघटित गुन्हा केला आहे. त्यामुळे तुमची नार्को टेस्ट झाली पाहिजे. तुमची अटक होणं गरजेचं आहे."

### सुनेत्रा वहिनींनी नेतृत्वातला खमकेपणा दाखवण्याची संधी दवडली!!

● दरम्यान, रुपाली चाकणकरांविरोधात रोष निर्माण झाल्यानंतरही त्यांनी राजीनामा दिला नव्हता. पक्षाकडूनही त्यांच्याबाबत प्रतिक्रिया आली नव्हती. अखेर, याप्रकरणात खुद्द मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हस्तक्षेप करावा लागला. त्यांनी आदेश दिल्याने चाकणकरांनी राजीनामा दिला. यामुळे सुषमा अंधारे यांनी सुनेत्रा पवारांवरही टीका केली. त्या म्हणाल्या, "काल राजीनाम्याचे निर्देश गृहमंत्र्यांनी दिले, खरंतर सुनेत्रा वहिनींनी हस्तक्षेपाची वेळच येऊ द्यायला पाहिजे नव्हती. सुनेत्रा वहिनींना नेतृत्वातला खमकेपणा दाखवण्याची काल एक संधी होती. ती संधी त्यांनी दवडली."



### अजित पवारांचा वारसा जपणारे?

सुषमा अंधारे पुढे म्हणाल्या, "अजित दादा कधीही गंडेदरे करणारे नव्हते. त्यांनी भोंदुगिरीला थारा दिला नाही. असे गंडे दोरे, अंगारे धुपारे करणारी बाई राष्ट्रावादीच्या प्रदेशाध्यक्ष पदावर असेल आणि तिच्यामुळे पक्षाची बदनामी होणार असेल तर तिला तातडीने महिला प्रदेशाध्यक्ष पदावरून पायउतार केले पाहिजे. अन्यथा ते करणं होणार नसेल तर आम्ही अजित दादांचा वारसा जपणारे आहोत असं कृपया सांगू नका."



## महिला आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. ज्योतीताई मेटेंची नियुक्ती करण्याची मागणी - डॉ. गणेश ढवळे

**बीड : प्रतिनिधी**

नुकत्याच रिक्त झालेल्या महिला आयोगाच्या अध्यक्षपदी संवेदनशील, उच्चशिक्षित, सुसंस्कृत आणि प्रदीर्घ प्रशासकीय अनुभव असलेल्या डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.





यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महिला आयोगाचे अध्यक्षपद हे अत्यंत जबाबदारीचे असून महिलांचे घटनात्मक हक्क, सुरक्षितता आणि कायदेशीर संरक्षण सुनिश्चित करण्याचे महत्त्वाचे कार्य या पदावरून केले जाते. महिलांवरील अत्याचार, घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ यांसारख्या प्रकरणांची दखल घेऊन सखोल चौकशी करणे आणि योग्य ती कारवाई करणे ही आयोगाची प्रमुख जबाबदारी आहे.

तसेच, महिलांच्या सुरक्षेशी संबंधित कायद्यांचे पुनरावलोकन करून त्यामध्ये ● पान २ वर...

## अवकाळी पावसाचा तडाखा : आमदार संजनाताई जाधव यांची नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

### तात्काळ पंचनाम्यांच्या सूचना; वीज पडून दोन जनावरांचा मृत्यू

**कन्नड / विशाल भालेराव :**

कन्नड शहरासह तालुक्यात १८ व १९ मार्च रोजी रात्रीच्या वेळी झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेली पिके उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी बांधव हवालदिल झाले असून सर्वत्र हानीचे चित्र पाहायला मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी आमदार संजनाताई जाधव यांनी तहसिलदार सारिका भगत, तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ, गटविकास अधिकारी ओमप्रकाश रामावत यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सोबत घेत नुकसानग्रस्त



भागांचा पाहणी दौरा केला. त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्ष जाऊन नुकसानीची पाहणी करत तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. ● पान २ वर...

## राजेभाऊ काळे यांची नाकलगांवच्या पोलिस पाटील पदी निवड

**दिंद्रुड : प्रतिनिधी**

माजलगांव तालुक्यातील नाकलगांव येथील श्री. राजेभाऊ काळे यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर नाकलगांवच्या पोलिस पाटील पदाची निवड मिळवून कुटुंबाची मान उंचावली आहे.



नुकत्याच झालेल्या पोलीस पाटील भरती प्रक्रियेत त्यांनी कठीण स्पर्धेला सामोरे जात उल्लेखनीय यश संपादन केले. साधी परिस्थिती, मर्यादित साधनसामग्री आणि अनेक अडचणी असूनही त्यांनी हार न मानता सातत्याने अभ्यास केला व आपल्या ध्येयावर ठाम राहिले. त्यांच्या या यशामागे कुटुंबीयांचा भक्कम पाठिंबा, सहकार्यांचे योग्य मार्गदर्शन आणि गावकऱ्यांचे आशीर्वाद मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरले. त्यांच्या या संघर्षमय प्रवासाने गावातील तरुणांना नवी दिशा दिली असून "परिस्थितीपेक्षा जिद्द मोठी" हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दिला आहे.

राजे काळे यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, कुटुंबीय आणि गावकऱ्यांना देत पुढील काळात गावाच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहणार असल्याचे सांगितले. कायदा व सुव्यवस्था राखणे, नागरिकांच्या समस्या ऐकून घेणे आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करणे, हा त्यांचा संकल्प आहे.

या निवडीबद्दल ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

राजे काळे यांचे यश हे केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण नाकलगांवकरांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या यशामुळे गावातील युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून अनेकांसाठी ते प्रेरणास्थान बनले आहेत.

### वृत्तपत्रांची आर्थिक पिळवणूक थांबवावी ➤ २३ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'लक्ष्यवेधी आंदोलन'

## बीडमधील वृत्तपत्रांची ५० लाख रुपयांची जाहिरात देयके १० वर्षांपासून प्रलंबित

**बीड : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विविध भूसंपादन कार्यालयामार्फत स्थानिक वृत्तपत्रांना देण्यात आलेल्या जाहिरातींची सुमारे ५० लाख रुपयांची देयके गेल्या १० वर्षांपासून प्रलंबित आहेत. प्रशासकीय हलगर्जीपणामुळे मंत्रालयात तांत्रिक त्रुटीच्या नावाखाली हे प्रस्ताव धूळ खात पडले असून, वृत्तपत्रांची होणारी आर्थिक गळचेपी थांबवण्यासाठी आता सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली येत्या सोमवारी (दि. २३ मार्च) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'लक्ष्यवेधी आंदोलन' करण्यात येणार आहे.



बीड जिल्ह्यातील विविध शासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन केले जाते, ज्यांच्या कायदेशीर जाहिराती स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केल्या जातात. मात्र, या जाहिरातींची देयके वेळेवर अदा न केल्याने मोठा डोंगर उभा राहिला आहे. विशेष म्हणजे, सन २०२१ ते २०२४ या काळात भूसंपादन कार्यालयाकडून रोहयो आयुक्तांमार्फत मंत्रालयाकडे पाठवण्यात आलेल्या प्रस्तावांमध्ये काही तांत्रिक त्रुटी काढण्यात आल्या होत्या. मंत्रालयाने हे प्रस्ताव दुरुस्तीसाठी जिल्हा स्तरावर परत पाठवले, मात्र संबंधित कार्यालयांनी या त्रुटी दूर करून प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात स्वारस्य दाखवले नाही. यामुळे गेल्या ३-४ वर्षांपासून हे प्रस्ताव प्रलंबित आहेत.



वृत्तपत्रांची आर्थिक कोंडी

एकीकडे सरकार पारदर्शकतेचा दावा करत असताना, दुसरीकडे बीडमधील प्रशासकीय अधिकारी जाहिरातींची बिले अडवून वृत्तपत्रांची गळचेपी करत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. वारंवार निवेदने देऊन आणि धरणे आंदोलने करूनही केवळ आश्वासनेच मिळाली, प्रत्यक्ष निधी मिळाला नाही. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आता 'बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघा'ने कंबर कसली आहे.

### 23 मार्चला 'लक्ष्यवेधी' एल्गार

या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर (मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ) यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि. २३.०३.२०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येणार आहे. या आंदोलनानंतर तरी जिल्हा प्रशासन आणि सरकारला जाग येणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**प्रमुख मागण्या:**

● प्रलंबित ५० लाख रुपयांचा निधी तातडीने मंजूर करावा. ● मंत्रालयाने काढलेल्या तांत्रिक त्रुटी त्वरित दूर करून प्रस्ताव पुन्हा सादर करावेत. ● दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून वृत्तपत्रांची आर्थिक पिळवणूक थांबवावी.

## अमेरिका मध्य पूर्वेतील आपली लष्करी उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या अगदी जवळ -ट्रम्प

मध्य पूर्वेतील तणावाचा आज २२ वा दिवस आहे. युद्धाचा चौथा आठवडा सुरू होऊनही परिस्थिती अनिर्णित आहे. दोन्ही बाजू सतत ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा करत आहेत. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणबाबत एक मोठा दावा केला आहे. 'ट्रुथ सोशल' वरील एका पोस्टमध्ये, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी सूचित केले आहे की, अमेरिका मध्य पूर्वेतील आपली लष्करी उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या अगदी जवळ आहे.

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# रमजान ईद : संयम, समता आणि मानवतेचा प्रकाशोत्सव





## विशेष

**प्रवीण बागडे**
नागपूर मो.क्र. ९९२३६२०९१९

भारतीय समाजाच्या सांस्कृतिक विश्वात विविध धर्म, परंपरा आणि श्रद्धा यांचे सुंदर सहअस्तित्व आढळते. या विविधतेतूनच एकात्मतेची खरी ताकद निर्माण होते. प्रत्येक सण हा केवळ एका धर्मापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण समाजाला काही ना काही जीवनमूल्य देऊन जातो. अशाच मूल्यांनी समृद्ध असलेला, संयम, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारा सण म्हणजे ईद अल-फितर, ज्याला आपण रमजान ईद म्हणून ओळखतो. रमजान महिन्याच्या अखेरीस येणारी ही ईद केवळ आनंदाचा उत्सव नाही; ती आहे एका महिनाभर चाललेल्या आत्मशुद्धीच्या साधनेचा, संयमाच्या तपस्येचा आणि मानवतेच्या जाणीवेचा उत्सव. या सणाकडे केवळ धार्मिक विधी म्हणून पाहणे म्हणजे त्याच्या मूळ आशयाला कमी लेखणे होय. कारण रमजान ईद आपल्याला शिकवते, भूक काय असते, त्याग काय असतो आणि माणुसकीची खरी ओळख काय असते.

इस्लाम धर्मातील पवित्र रमजान महिन्यात मुस्लीम बांधव सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उपवास (रोजा) पाळतात. हा उपवास केवळ अन्न-पाण्याचा त्याग नसतो; तो वाईट विचार, वाईट कृती आणि अहंकार यांच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न असतो. रमजान म्हणजे एक प्रकारे आत्मशुद्धीची शाळा आहे. येथे संयम शिकवला जातो, सहनशीलता वाढवली जाते आणि माणसाला स्वत:कडे पाहण्याची संधी दिली जाते. भूक आणि तहान अनुभवताना माणूस समाजातील गरिबांच्या वेदना समजून घेतो. त्यामुळेच रमजान हा केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक संवेदनशीलता वाढवणारा कालखंड आहे.

रमजान संपल्यानंतर येणारी ईद म्हणजे आनंद, उत्साह आणि कृतज्ञतेचा दिवस. एक महिनाभर केलेल्या साधनेनंतर हा दिवस येतो, जणू काही अंधारानंतर उजेडाचा उत्सव. या दिवशी मुस्लीम बांधव एकत्र येऊन नमाज अदा करतात, एकमेकांना आलिंगन देतात आणि "ईद मुबारक" म्हणत आनंद साजरा करतात. परंतु ईदचा खरा अर्थ केवळ नवीन कपडे, स्वादिष्ट पदार्थ किंवा उत्सव यात नाही; तर तो आहे मनातील कटुता विसरून एकमेकांशी प्रेमाने वागण्याचा संदेश.

रमजान आणि ईदचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे जकात आणि फितर. समाजातील गरजू लोकांना मदत करणे ही इस्लाम धर्माची एक महत्त्वाची शिकवण आहे. जकात म्हणजे आपल्या उत्पन्नाचा काही भाग गरिबांसाठी देणे. तर फितर म्हणजे ईदपूर्वी गरजू लोकांना मदत करून त्यांनाही सण साजरा करता यावा याची काळजी घेणे. या परंपरेमागील विचार अत्यंत सुंदर आहे. सणाचा आनंद तेव्हाच खरा, जेव्हा तो सर्वांसोबत वाटला जातो. आजच्या भांडवलशाही आणि विषमतेच्या जगात हा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात रमजान ईद हा सण केवळ मुस्लीम समाजापुरता मर्यादित राहत नाही. तो सर्व धर्मीय लोकांना एकत्र आणतो. मित्र, शेजारी, सहकारी एकमेकांच्या घरी जाऊन शुभेच्छा देतात, शिरखुर्मा आणि सेवयांचा आस्वाद घेतात. ही परंपरा आपल्याला शिकवते धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच असते. आजच्या तणावग्रस्त सामाजिक वातावरणात हा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे.

आजच्या काळात समाज अनेक आव्हानांना सामोरा जात आहे. धार्मिक तणाव, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता आणि वाढती असहिष्णुता. अशा परिस्थितीत रमजान ईद आपल्याला एक वेगळा मार्ग दाखवते संयमाचा, सहिष्णुतेचा आणि परस्पर आदराचा. परंतु दुर्दैवाने अनेकदा सणांचे व्यापारीकरण होताना दिसते. त्यांचा मूळ संदेश हरवतो आणि ते केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहतात. म्हणूनच गरज आहे ती रमजान ईदचा खरा अर्थ समजून घेण्याची.

रमजान ईद आपल्याला शिकवते भूक अनुभवली तरच दुसऱ्याची भूक समजते. त्याग केला तरच इतरांच्या वेदना कळतात आणि प्रेम दिले तरच समाजात शांतता निर्माण होते. हा सण आपल्याला केवळ चांगला मुस्लीम नाही, तर चांगला माणूस बनण्याचा संदेश देतो. आजच्या पिढीने रमजान ईद केवळ परंपरा म्हणून साजरी न करता तिचा खरा अर्थ समजून घ्यायला हवा. संयम, त्याग, समता आणि मानवता ही मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात रुजवली तरच या सणाचे खरे महत्त्व उलगडेल.

समाज म्हणून आपण स्वत:ला प्रश्न विचारायला हवा, आपण खरंच एकमेकांच्या वेदना समजून घेत आहोत का? आपण समाजात समता आणि बंधुभाव वाढवत आहोत का?

रमजान ईद हा सण केवळ आनंदाचा नाही; तो आहे आत्मपरीक्षणाचा, संवेदनशीलतेचा आणि मानवतेचा उत्सव. हा सण आपल्याला शिकवतो धर्माचा खरा अर्थ विधीमध्ये नाही, तर माणुसकीमध्ये आहे. आजच्या बदलत्या आणि कधी कधी तणावपूर्ण वातावरणात रमजान ईदचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. जर आपण या सणाच्या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान दिले, तर समाज अधिक सुसंवादी, समताधिष्ठित आणि शांततापूर्ण होऊ शकतो. रमजान ईदच्या पवित्र पर्वानिमित्त सर्वांना प्रेम, बंधुभाव, समता आणि मानवतेच्या मूल्यांनी समृद्ध अशा हार्दिक शुभेच्छा!

# कराओके : संगीताच्या दारातली एक हौशी पायरी"

**भारतीय** संस्कृतीत संगीत हे केवळ करमणुकीचं साधन नाही, तर जीवनाचा अविभाज्य भाग आहे. देवळातल्या आरतीतून, अंगाईगीतांतून, शेतातल्या ओव्यातून, मैफिलीतल्या रागांतून आणि चित्रपटातील गाण्यांतून संगीत सतत आपल्या आयुष्याला स्पर्श करत असतं. म्हणूनच जेव्हा तंत्रज्ञानाने कराओकेसारखी सोय दिली, तेव्हा अनेकांना वाटलं की आता गाणं फक्त ऐकण्यापुरतं राहिलं नाही, तर प्रत्येकाला ते अनुभवता येईल.







## विशेष

**डॉ. संध्या मोहिते**
सूत्रसंचालन, लेखीका, कवियीत्री



कराओकेची कल्पना खरंतर खूप सुंदर आहे. आवडत्या गाण्याचं संगीत वाजतं, शब्द समोर दिसतात आणि आपण त्या गाण्यात सामील होतो. एक प्रकारे ही रसिकाला गाण्याच्या जवळ नेणारी वाट आहे. पूर्वी मंचावर गायक असायचा आणि श्रोते खाली. आता मात्र त्या अंतरात थोडीशी जवळीक निर्माण झाली आहे.

पण इथेच एक नाजूक गोष्ट आहे — संगीताशी असलेली जाणीव आणि नम्रता.

अनेकदा असं दिसतं की गाणं आवडणं आणि गाणं गाता येणं या दोन गोष्टी एकत्र केल्या जातात. एखादं गाणं मनाला भिडतं, त्याचे शब्द भावतात, धून कानात रेंगाळते आणि मग अचानक वाटतं — "हे तर मीही गाऊ शकतो."

पण जसं एखादा चित्रपट पाहून आपण लगेच उत्कृष्ट अभिनेता होत नाही, तसंच एखादं गाणं ऐकून आपण गायक होतोच असं नाही.

संगीत ही कला आहे, आणि प्रत्येक कलेमागे साधना असते. अनेक महान गायकांनी आपल्या आयुष्यातील असंख्य तास रियाजासाठी दिले. त्यांच्या आवाजातली सहजता ही प्रत्यक्षात वर्षानुवर्षांच्या प्रयत्नांची फलश्रुती असते. आपण जे सहज ऐकतो, ते त्यांच्या दृष्टीने दीर्घ परिश्रमाचं फळ असतं.

आजच्या काळात मात्र परिस्थिती थोडी बदललेली दिसते. मोबाईल, ॲप्स आणि सोशल मीडियामुळे गाणं रेकॉर्ड करणं आणि ते जगासमोर ठेवणं फार सोपं झालं आहे. कराओके लावा, गाणं गा आणि लगेच ते इंटरनेटवर पोहोचतं. मित्रमंडळी कौतुक करतात, टाळ्या मिळतात आणि आपल्यालाही वाटू लागतं की आपण छान गातो.

पण कधी कधी या कौतुकामागे खरी ऐकण्याची सवय नसते. कारण खऱ्या संगीतामध्ये काही मूलभूत गोष्टी असतात — सूर, ताल आणि लय. या तिन्हींचं नातं जुळलं की गाणं जन्माला येतं. अन्यथा ते फक्त आवाजांची मालिकाच राहते.

रसिक हा सहनशील असतो. नवख्या गायकाच्या चुका तो माफ करतो. प्रयत्नांना तो दाद देतो. पण जेव्हा गाण्यातील सूर आणि ताल पूर्णपणे वेगळ्या दिशेला जातात, तेव्हा मात्र श्रोत्याला थोडं अवघडल्यासारखं वाटतं. कारण संगीताचा आनंद मिळण्याऐवजी तो एक विचित्र प्रयोग बनतो.

याचा अर्थ असा नाही की लोकांनी गाणं गाऊच नये. उलट गाणं ही मनाला आनंद देणारी गोष्ट आहे. स्वत:साठी गाणं, मित्रांत गाणं, आनंदाने गाणं — यात काहीच गैर नाही. पण जर आपण गाणं सादर करणार असू, तर त्यामागे थोडी तयारी असली तर त्या आनंदाला अधिक सौंदर्य येतं.

थोडासा सराव, सुरांची जाणीव, तालाची ओळख — या छोट्या गोष्टी गाण्याला वेगळंच रूप देतात. मग कराओके फक्त करमणूक राहत नाही, तर संगीताच्या जवळ जाण्याचा खरा मार्ग बनतो.

खरंतर प्रत्येकाने स्वत:ला एक साधा प्रश्न विचारावा —

आपल्याला गाणं खरंच आवडतं का?

की आपण गातो ते लोकांनी पाहावं, इतकंच आपल्याला आवडतं?

या दोन गोष्टींमधला फरक समजला की संगीताशी आपलं नातं अधिक प्रामाणिक होतं.

कराओकेचं सौंदर्य हे गायक बनण्यात नाही, तर संगीताशी मैत्री करण्यात आहे. गाणं गा, आनंदाने गा, पण सुरांचा आदर ठेवा. कारण संगीत ही केवळ छंदाची गोष्ट नाही — ती आपल्या संस्कृतीची, संवेदनांची आणि परंपरेची ओळख आहे.

आणि कदाचित तेव्हाच कराओकेच्या मैफिलीतून फक्त आवाज ऐकू येणार नाहीतर खऱ्या अर्थाने संगीत उमलताना ऐकू येईल.

# जागतिक चिमणी दिवस



## विशेष



**डॉ. अच्युत बन**

**सकाळी** अगदी घाईघाईने उमाशंकर उद्यानाकडे जात होतो. थोडासा उशीर झालेला होता म्हणून पावलांची गती अधिक होती. इतक्यात खाली पायाजवळ रस्त्यावर एक छोटसं पाखराचे पिल्लू उभे असलेले मला दिसले.
ते पिल्लु स्तब्ध, निश्चल अशा अवस्थेत उभे होते.
ते पिल्लू फारशी हालचाल करत नव्हते. त्या पिकाकडे पाहता एकतर ते पिल्लू जखमी असावे, किंवा आजारी पडले असावे असे मला वाटले.
अशा विकलांग पिल्लांची देखरेख कशी करावी याची मला काहीही माहिती नाही. म्हणून मी त्याला तसेच सोडून पुढे निघून गेलो. जाताना मोबाईल कॅमेऱ्यात त्याची छवी मात्र टिपून घेतली.
थोड्या वेळाने मोबाईल फोन उघडून पाहिल्यावर आज जागतिक चिमणी दिवस असल्याचे समजले.
योगायोग पाहा!
आज जागतिक चिमणी दिवस, आणि सकाळीच एका आजारी पिलाचे असे दर्शन झाले.
आजकाल आपल्या अवतीभोवती होणारी चिमण्यांची वर्दळ काहीशी कमी झालेली दिसून येते.
पर्यावरणाची झालेली हानी, कॉंक्रिटची अधांधुंद वाढलेली जंगले, पाण्याचे दुर्भिक्ष्य अशा अनेक कारणांमुळेच चिमण्यांचा चिवचिवाट कमी झालेला आहे.
चिमणी एक इवलासा पक्षी पर्यावरणातील महत्वाचा घटक असून आपल्या घराभोवती भिरभिरणारा खुप मोहक असा मित्र आहे.
आपल्या मुलांचे बालपण मोहरून टाकणारा हा पक्षी आजही विविध बाल काव्यातून चिवचिवत असतो.
"एक घास काऊचा, एक घास चिऊचा"
"कावळ्याचे घर मातीचे, चिमणीचे घर मेणाचे"
असे म्हणत घास भरवणाऱ्या आईचे चित्र माझ्या डोळ्यासमोर उभे राहीले.
आमच्या चळवळ्या नातीला खेळवताना गंमतीचा बदल करून तयार केलेले चिऊचे गीत मी तिला ऐकवत असतो.
"चिव चिव चिमणी चिमुरडी,
आहेस मोठी भिकारडी,
शर्यत लावतेस का अवनीशी"!
अशी अनेक बडबड गिते या चिमुरड्या चिऊताईवर बेतलेली आहेत.
अनेक कवी- कवयित्रींनी या चिमुरड्या चिमणीवर अनेक गाणी लिहिली आहेत.
आता उन्हाळ्याची सुरुवात झालेलीच आहे.
चिमणी सारख्या अवती भवती घिरट्या घालणाऱ्या पक्षांच्या खाण्यापिण्याची आपण सोय करून ठेवायला हवी.
गार्डनमधे आम्ही जाणूनबुजून चिवडा व इतर खाऊचे दाणे लॉनवर सांडतो. हे दाणे चिमण्या, बुलबुल आणि रॉबिन पक्षी खाऊन आपले क्षुधा शांत करतात.
"एक मुठ धान्य, एक ओंजळ पाणी" ही मोहीम जागतिक चिमणी दिवसासाठी प्रसिद्ध केलेली आहे. ती मोहीम सर्वांनी यशस्वीपणे राबवली तर चिमण्यांची संख्या नक्कीच वाढेल.
आज सकाळीच रस्त्यावर पडलेल्या पिलाला उपचार मिळाले असते तर ते पिल्लू स्वत:च्या पंखाने उडत उडत आपल्या आईबाबांना भेटले असते.
काही वर्षांपूर्वी श्रीलंकेत "पिनावाला हत्ती घर" नावाचे हत्तींचे घर बघितले होते.
आजारी व बेवारस हत्तींच्या पिलांचे तेथे पालनपोषण केले जाते. अशीच सोय या आजारी पाखरांसाठी झाली तर ...
जागतिक चिमणी दिवसाच्या लहानथोर मित्रांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

## महिला आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. ज्योतीताई मेटेंची नियुक्ती करण्याची मागणी — डॉ. गणेश ढवळे

●पान १ वरून... आवश्यक सुधारणा सुचवणे, महिला सक्षमीकरणासाठी जनजागृती करणे, स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी मोहिमा राबवणे, तसेच कारागृह व सुधारगृहांमध्ये महिलांच्या स्थितीची पाहणी करून आवश्यक उपाययोजना करणे, ही देखील आयोगाची महत्त्वाची कार्ये आहेत.

सध्याच्या काळात वाढत असलेल्या सायबर गुन्हे आणि कार्यस्थळी होणाऱ्या छळाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सक्षम आणि अनुभवी नेतृत्वाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे डॉ. ज्योतीताई मेटे यांसारख्या पात्र उमेदवाराची नियुक्ती करून महिला आयोगाची प्रतिमा अधिक सक्षम व विश्वासार्ह करण्याची संधी शासनाने साधावी, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे.

## अवकाळी पावसाचा तडाखा : आमदार संजनाताई जाधव यांची नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

●पान १ वरून... या दौऱ्यात आमदार जाधव यांनी आमदाबाद, नाचनवेल, सारोळा, शेलगाव, वाकद, दिगाव, दहीगाव, जामडी, मोहाडी, खेडी, बरकतपूर, चिंचोली लिंबाजी आदी गावांतील शेतांना भेट देत शेतकऱ्यांशी संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

"सर्व संबंधित यंत्रणांनी तत्काळ पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळवून द्यावी," अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. या वेळी तहसिलदार सारिका भगत, कृषी अधिकारी संदीप शिरसाठ, गटविकास अधिकारी ओमप्रकाश रामावत, पंचायत समिती सदस्य जगन जंगले, ग्राममहसूल अधिकारी सतिश बनकर, संगीता सूर्यवंशी, राजू नवले, विशाल निकम, बाबुराव बनकर, अकबर शहा, कलीम शहा, भागवत राजपूत, गणेश भोसले, गणेश जंगले, एकनाथ लोणीकर यांच्यासह संबंधित अधिकारी, सरपंच, उपसरपंच व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, १९ मार्च रोजी झालेल्या पावसात वीज पडून खापरखेड येथील किसन यादवराव थोरात यांची गाय व जळगाव घाट येथील बाबासाहेब त्रिंबक सिरसाट यांचा बैल दगावल्याची घटना घडली आहे.


• सांज दैनिक बीड • वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष



## पैठण एमआयडीसी पोलिसांची कारवाई; बालानगर येथुन ५०० किलो गोमांस जप्त

### चार जणांना ताब्यात घेत गुन्हा दाखल

➤ **पैठण** : पैठण एमआयडीसी पोलिसांनी शुक्रवार रोजी पहाटे बालानगर येथे केलेल्या धडाकेबाज कारवाईत गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करून त्याचे मांस विक्री करणाऱ्या चार जणांच्या मुसक्या आवळल्या आहे .यावेळी पोलिसांनी ५०० किलो गोवंश जातीच्या मांसासह दोन मोटर सायकल असा एकूण १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे .या विषयी सविस्तर माहिती अशी की, पैठण एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांना आपल्या गुप्त खबऱ्या मार्फत अशी माहिती मिळाली की, बालानगर परिसरातील गणी सांडू शेख यांच्या शेतातील बाभळीच्या झाडाखाली काही लोक निर्दयपणे गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करून त्याचे मांस विक्री करत आहे .मिळालेल्या माहिती आधारे सपोनि जगदाळे यांनी तात्काळ या कामी पोलिसांचे एक पथक तयार करुन सदर ठिकाणी पहाटे पाच वाजेच्या सुमारास छापा टाकला असता घटनास्थळी ५०० किलो गोवंश जातीचे मांस विक्री करण्यासाठी ठेवलेले मिळून आले . त्यासोबत मांस कापण्याचे साहित्य, दोन मोटार सायकल असा एकूण १,७०,८५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून यातील आरोपी गणी सांडु शेख, महेमूद सत्तार शेख, मुजाहीद गणी शेख, मुस्तकीम गणी शेख सर्व रा .बालानगर याना ताब्यात घेत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला सदरील धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधिक्षक अन्नपूर्णा सिंह, उप विभागीय पोलीस अधिकारी सुनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि ईश्वर जगदाळे, पोउपनि कविता जगताप, पोह दिनेश दाभाडे, करतारसिंग सिंगल, पोना ज्ञानेश्वर भवर, पोकॉ अंकुश रहाटवाड यांनी केली . या प्रकरणी पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कविता जगताप या करत आहेत .

# महावितरणच्या कारभाराविरोधात दाम्पत्याचा आत्मदहनाचा प्रयत्न; पोलिसांच्या हस्तक्षेपाने अनर्थ टळला

### ➤ केज येथे घटनेने खळबळ; तक्रारीवर महिन्याभरात चौकशीचे लेखी आश्वासन

➤ **केज / प्रतिनिधी** : येथील महावितरण कार्यालयाच्या कारभाराविरोधात संतप्त झालेल्या एका दाम्पत्याने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली . मात्र, घटनास्थळी उपस्थित पोलिस कर्मचारी व पत्रकारांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला .

विनायक गंगाधर लोंढे ( रा . रमाई नगर, बीड रोड, केज ) यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत . लोंढे हे ७५ टक्के अपंग असून, त्यांना नियमित वीज बिल न देता अचानक सुमारे २० हजार



रुपयांची थकबाकी दाखवत ७ मार्च रोजी वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याचा त्यांचा दावा आहे .तसेच, वीज कनेक्शन तोडू नये यासाठी कर्मचाऱ्यांनी पैशांची मागणी केल्याचाही आरोप त्यांनी केला आहे . नंतर कार्यालयात जाऊन अंशत : बिल भरण्याची तयारी दर्शवूनही अधिकाऱ्यांकडून गैरवर्तन झाल्याचे लोंढे यांनी सांगितले .

या प्रकरणी लोंढे यांनी पूर्वी रस्ता रोको आंदोलन केले होते . मात्र, त्याची दखल न घेतल्याचा आरोप करत त्यांनी २० मार्च रोजी महावितरण कार्यालयाच्या आवारात पत्नीसमवेत आत्मदहनाचा प्रयत्न केला .

घटनास्थळी उपस्थित पोलीस अधिकारी व पत्रकारांनी वेळीच हस्तक्षेप करत दोघांना रोखले . यानंतर पोलिसांच्या मध्यस्थीने संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली . आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांवर एक महिन्याच्या आत चौकशी करून कारवाई करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले .

या आश्वासनानंतर लोंढे यांनी आंदोलन तातुरते मागे घेतले असून, न्याय न मिळाल्यास पुढील काळात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे .

**वीज बिल व कारवाईच्या वादातून दाम्पत्य संतप्त**

- महावितरण अधिकाऱ्यांवर गैरवर्तन व आर्थिक मागणीचे आरोप
- रस्ता रोकोनंतरही दखल न घेतल्याचा आरोप
- आत्मदहनाचा प्रयत्न ; पोलिस व पत्रकारांनी वेळीच रोखले
- प्रशासनाकडून महिन्याभरात चौकशीचे लेखी आश्वासन

## काडीवडगावच्या शनिदेव व मारुती मंदिरात प्रति अमावस्या सोहळा उत्साहात

➤ **माजलगाव / प्रतिनिधी** : शहरापासून जवळच असलेल्या काडीवडगाव येथील शनिदेव व मारुती मंदिरात दर महिन्याला येणाऱ्या अमावस्येनिमित्त आयोजित करण्यात येणारा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला . परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धा व भक्तीभावाने दर्शन घेत आहेत .

यावेळी ह भ प कल्याण नाना शेंडगे, सटवा आप्पा काळे, नाथा महाराज, शिवाजी घायतीडक, त्रिंबक फपाळ, बाबासाहेब म .कर्डिले, भगवान गोपाळ, गवते आप्पा, अशोक मेंडके, महादेव धपाटे, घनश्याम पांचाळ, नारायण पवार, गावडे नाना, तुळशीराम वैराळे, महाराज शिंगणे, प्रल्हाद फपाळ, उद्धव फपाळ, चैतन्य बादाडे, मृदंगाचार्य विष्णू महाराज बादाडे, विठ्ठल क्षीरसागर, कृष्णा जाधव, बालासाहेब पांचाळ, पवन धपाटे इत्यादी उपस्थिती होती व महिलाही मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या अमोशाचे अन्नदाते आदिनाथ महाराज फपाळ व कार्यक्रमाचे संयोजक विक्रम राऊत इत्यादी उपस्थित होते . अमावस्येच्या दिवशी पहाटेपासून



मंदिरात अभिषेक, पूजाअर्चा, शनि महाराजांची विशेष पूजा तसेच मारुतीरायांची आरती करण्यात येते . दिवसभर हरिनाम सप्ताह, भजन–कीर्तन, तसेच प्रवचनांचा कार्यक्रम आयोजित केला जातो . महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले .

या सोहळ्यामुळे गावात धार्मिक वातावरण निर्माण होत असून, लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण उत्साहाने सहभाग घेत आहेत .

## मानधनाचा त्याग करून समाजसेवेची वाट – बंटी सुरे यांचा स्तुत्य निर्णय

➤ **कन्नड / प्रतिनिधी** : कन्नड नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक २ मधून निवडून आलेले नगरसेवक पंकज ( बंटी ) देविदास सुरे यांनी समाजहिताचा विचार करत एक कौतुकास्पद निर्णय घेतला आहे . त्यांनी आपल्या बैठकीसाठी मिळणारे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याची विनंती केली आहे .

यासंदर्भात त्यांनी कन्नड नगरपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ च्या कलम ६१ ( १ ) अंतर्गत मिळणारे भत्ते या निधीत वर्ग करण्यात यावेत, अशी मागणी केली आहे .

या निधीतून गरजू दिव्यांग बांधव आणि रुग्णांना वैद्यकीय मदत मिळावी, हा त्यांचा उद्देश आहे . विशेष म्हणजे, बंटी सुरे हे सुरुवातीपासूनच सामाजिक कामात सक्रिय असून परिसरातील विविध समस्या सोडवण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न



करत आहेत . त्यांच्या या निर्णयामुळे समाजसेवेचा आदर्श निर्माण झाला असून नागरिकांकडून त्यांचे कौतुक केले जात आहे .

# एसटी बस ला उत्पन्नाच्या तुलनेत 'एसटी 'ला दररोज २ कोटींचा तोटा

### ➤ महसूल वाढीसाठी इंधन विक्री क्षेत्रात उतरणार ➤ परिवहन मंत्री सरनाईक यांनी आखली विशेष योजना

➤ **मुंबई** : राज्याची जीवनवाहिनी असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला ( एसटी ) सध्या दररोज १ ते २ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे . सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा संचित तोटा असलेल्या एसटीला केवळ तिकीट विक्रीवर अवलंबून राहणे आता शक्य नाही . या पार्श्वभूमीवर, महामंडळाने डिझेल खरेदीत पारदर्शकता आणून वार्षिक २४१ कोटींची बचत साधली असून, आता उत्पन्न वाढीसाठी व्यावसायिक इंधन विक्री आणि जाहिरात क्षेत्रात आक्रमक पाऊल टाकले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटीचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी दिली .

फेब्रुवारी २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात एसटीला सुमारे ७५० कोटी रुपयांचा तोटा झाला आहे . हा तोटा भरून काढण्यासाठी महामंडळाने 'पर्यायी उत्पन्न स्रोत' निर्माण करण्याची विशेष योजना आखली आहे . डिझेल खरेदीच्या निविदा प्रक्रियेत कोणताही राजकीय हस्तक्षेप न होऊ दिल्याने महामंडळाला मोठा आर्थिक फायदा झाला आहे . यापूर्वी प्रति लिटर मिळणारी २ .७० रुपयांची सवलत आता ५ .१३ रुपयांपर्यंत वाढली आहे . एसटीला वर्षाकाठी ४० कोटी लिटर डिझेल लागते, ज्यावर सुमारे ३ हजार ४०० कोटी रुपये खर्च होतात . नव्या निविदा प्रक्रियेमुळे दरात प्रति लिटर २ .१३ रुपयांची अतिरिक्त सवलत मिळाल्याने महामंडळाचे वर्षाला २४१ कोटी रुपये वाचणार आहेत . काही कंपन्यांनी या प्रक्रियेत खोडा घालण्याचा प्रयत्न केला, मात्र न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने महामंडळाच्या पारदर्शक भूमिकेवर शिक्कामोर्तब झाले, असे सरनाईक यांनी नमूद केले .

**एसटी इंधन विक्री क्षेत्रात उतरणार :**

● एसटी आता स्वत : व्यावसायिक इंधन विक्री क्षेत्रात उतरणार आहे . सार्वजनिक–खाजगी भागीदारी ( पीपीपी ) तत्त्वावर



राज्यातील १०० ते ११० ठिकाणी 'मल्टी–मोडल' इंधन पंप उभारले जातील . येथे डिझेल, पेट्रोलसह सीएनजी, एलएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा असेल . धुळे येथील प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाला असून, या उपक्रमातून वार्षिक १०० कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले .

● इंधन भरताना होणारी गळती आणि अनियमितता रोखण्यासाठी महामंडळ आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा ( एआय ) आधार घेणार आहे . प्रत्येक एसटी बसच्या इंधन टाकीला आणि पंपाच्या नोझलला एआय आधारित सेन्सर बसवले जातील . सध्याच्या पारंपरिक पद्धतीत दर १०० लिटरमागे होणारी ४ ते ५ लिटरची घट या तंत्रज्ञानामुळे पूर्णपणे थांबवता येईल .


**जाहिरातींतून 250 कोटींचे लक्ष्य :**

● एसटीच्या ६०० बसस्थानकांवरून दररोज ५० ते ५५ लाख प्रवासी प्रवास करतात . या 'फूटफॉल'चा वापर जाहिरातींसाठी केला जाणार आहे . डिजिटल फलक आणि बसच्या अंतर्गत–बाह्य भागातील जाहिरातींमधून पुढील पाच वर्षांत २५० कोटी रुपये मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे . सध्या हे उत्पन्न केवळ २० कोटींच्या घरात आहे .

**सौरऊर्जा प्रकल्प राबवणार**

● त्याशिवाय बसस्थानकांच्या छतावर सौर प्रकल्प उभारून वीज विक्रीतून १५ कोटींची बचत केली जाणार आहे . चालक–वाहकांच्या ड्युटी नियोजनात एआयचा वापर करून ओव्हरटाइम खर्चात कपात केली जाईल, जुन्या बसच्या विल्हेवाटीतून अतिरिक्त महसूल मिळवण्याचे नियोजन आहे . एसटीमध्ये आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता आणणे हे आमचे प्राधान्य आहे . केवळ सरकारी मदतीवर अवलंबून न राहता, स्वावलंबी होऊन एसटीला तोट्यातून बाहेर काढण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले .

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी ( हिंदी )
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

# कु. श्रावणी मुळे व चि. यशराज कदम यांची नवोदयसाठी निवड

**माजलगाव : प्रतिनिधी**




तालुक्यातील कोथरूळ गावासाठी अभिमानाची बातमी आहे. येथील कु. श्रावणी सर्जेराव मुळे व चि. यशराज खंडू कदम यांची प्रतिष्ठित जवाहर नवोदय विद्यालय, गढी येथे पुढील शिक्षणासाठी निवड झाली आहे.
अत्यंत कठीण व स्पर्धात्मक अशा नवोदय प्रवेश परीक्षेत यश मिळवणे ही मोठी कामगिरी मानली जाते. कु. श्रावणी व चि. यशराज यांनी प्रचंड मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

या यशामागे त्यांचा सातत्यपूर्ण अभ्यास, चिकाटी, आणि आत्मविश्वास यांचा मोठा वाटा आहे. तसेच पालकांचे योग्य मार्गदर्शन, सतत प्रोत्साहन आणि शिक्षकांचे मोलाचे सहकार्य यामुळेच यांना हे यश शक्य झाले. या दोघांनाही आपल्या मेहनतीने केवळ स्वत:चेच नव्हे तर आपल्या कुटुंबाचे आणि गावाचेही नाव उज्ज्वल केले आहे. यांच्या या यशाबद्दल कोथरूळ गावात आनंदाचे वातावरण असून, शिक्षक, ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यातही हे असेच यश संपादन करून आपल्या गावाचे नाव उंचावतील, अशी सर्वांना आशा आहे.

# गेवराईच्या जि प कन्या शाळेला आदर्श शाळा पुरस्कार




## पुण्याच्या ध्येय फाऊंडेशनने घेतली दखल

**गेवराई / प्रतिनिधी :**
ध्येय एज्युकेशन फाऊंडेशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रात राज्यस्तरावर उल्लेखनीय आदर्श निर्माण करणाऱ्या विद्या मंदिरांचा सन्मान सोहळा राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार गेवराई येथील जिल्हा परिषद कन्या शाळेला जाहीर करण्यात आला आहे .विशेष म्हणजे ही शाळा रोटरी क्लब ऑफ गेवराईने विकसित करण्यासाठी दत्तक घेतलेली आहे.
गेवराई शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असणारी जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा ही एक गेवराई शहरासाठी भुषनावह अशी वास्तू आहे .इथे आजपर्यंत हजारो ग्रामीण आणि शहरी भागातील मुली सुशिक्षित, साक्षर होऊन गेल्या .खाजगी संस्थांच्या अनेक शाळां आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांसोबत शैक्षणिक स्पर्धा करत गुणवत्ता टिकविण्यात यशस्वी ठरत आहे. संस्कारा सोबत शाळेत शिक्षणाचे आणि नैतिकतेचे धडे देत देत विद्यार्थी – विद्यार्थिनींच्या कलागुणांना प्रोत्साहन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सर्वच शिक्षकवृंद धडपडत असतात. ज्ञान विज्ञान, स्वसंरक्षण, शिस्त, कवायत, विविध मैदानी खेळ, वेळोवेळी समुपदेशन, व्याख्याने, कथाकथन वाचनालय, भौतिक सेवासुविधा, स्वच्छ व शुद्ध थंड पाणी माध्यान भोजन, केळी, बिस्किटे वाटप, आरोग्य शिक्षण आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन... या सर्व गोष्टींचा समावेश करत शाळा इथे भरते आहे. नुकत्याच झालेल्या दहावीच्या परीक्षा कॉपीमुक्त अभियान राबवत सिसिटीव्ही कॅमेऱ्याच्या सहाय्यानं सुरळीत पार पडल्या. शाळेच्या प्रगतीचा आलेख उंचावत ठेवण्यासाठी शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक विष्णू सोळुंके यांचे खुप मोठे योगदान आणि मार्गदर्शन आहे. तसेच उपक्रमशिल शिक्षकवृद नेहमी चढाओढीनं ज्ञानदानाचे पवित्र कार्य करण्यासाठी आपापल्या परीने कार्यरत आहे... नवोदय परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, साने गुरुजी परीक्षा, एमटीएसइ, एन,एम एम एस परीक्षा, होमी भाभा परीक्षा, ऑलंम्पीयाड परीक्षा चित्रकला या सर्व परीक्षांचे आयोजना सह चालू वर्षी सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात शाळेचे कार्य प्रेरणादायी आहे .अनेक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यींनींनी सहभाग घेऊन भरघोस बक्षिसे मिळवली. शालेय परिपाठ, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, वर्ग सूशोभिकरण, जयंतीनिमित्त भाषणे, प्रबोधनपर नाटीका, बाल कवी काव्यवाचन मुलींची स्वयं शिस्त तसेच शैक्षणिक प्रगती या सर्व निकषांवर खरं उतरत शाळा राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कारसाठी पात्र ठरली आहे. दि. २९ मार्च२०२६ रविवार रोजी पुणे येथे भव्य समारंभात ग .दी .माडगुळकर नाट्यगृह निगडी पुणे येथे सकाळी ९ वाजता या पुरस्काराचे वितरण होणार आहे.
हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शिक्षकबधु भगीनींसह शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचारीसह विद्यार्थ्यींनिमधे आनंद आणि उत्साह वाढला आहे .सर्व स्तरातून शाळेवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# धनगर जमातीच्या एस टी आरक्षण अंमलबजावणी साठी चलो मुंबई चलो मुंबई

## - मुक्तीराम आबुज, कल्याण गवते

**माजलगाव / प्रतिनिधी :**



तालुक्यातील व बिड जिल्ह्यातील धनगर जमातीला आव्हान करण्यात येते कि धनगर जमातीच्या एस टी आरक्षण अंमलबजावणी साठी मुंबई येथील आझाद मैदान येथे मल्हार योद्धे मा दिपक भाऊ बोराडे उपोषणाला बसलेले आहेत. भाऊंनी सर्व समाजाला आव्हान केले आहे की सर्व कामे आवरून सर्व समाज बांधवांनी दि २३ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता मुंबईच्या आझाद मैदान येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे २३ तारीख भाऊचा उपोषणाचा आठ दिवस पण समाज बांधवांना एक विनंती आहे भाऊची तब्येत जर खूप बिघडली तर याला जबाबदार आपण सर्व धनगर समाज बांधव असणार आहोत कारण भाऊ आपली वाट ज्याप्रमाणे एक बाळ आपल्या आईची वाट बघते त्याप्रमाणे दीपक भाऊ तुमची वाट बघत आहेत, माझा समाज आज तरी आझाद मैदानावर येईल उद्या तरी येईल परवा तरी येईल अशी आशा दीपक भाऊ बोराडे यांना लागलेली आहे.

दिवस मावळेपर्यंत दीपक भाऊ आपल्या समाजाची वाट एखाद्या लेकराप्रमाणे बघत आहेत आहेत, मैदानात संख्या दिसल्याशिवाय सरकार झुकणार नाही, आणि सर्टिफिकेट दिल्याशिवाय भाऊ माघार घेणार नाहीत, लढाई ही समाज बांधवांच्या हातात आहे कधी जिंकायची ते त्यामुळे सर्व समाज बांधवांना हात जोडून नम्र विनंती आहे मोठ्या संख्येने आपण २३ तारखेला आझाद मैदान मुंबई येथे उपस्थित रहावे, असे आवाहन सहकारी समाज बांधव मुक्तीराम आबुज, कल्याण गवते यांनी केले आहे.

# अर्धवट रस्ता, नागरिकांचा संताप उफाळला; गुत्तेदार बेपत्ता, प्रशासनाचे मौन!

**वडवणी : अशोक फपाळ :**
वडवणी ते चिंचोटी या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावरील रस्त्याच्या कामामुळे नागरिकांचे हाल अक्षरश: असह्य झाले आहेत. गुत्तेदाराने रस्ता पूर्णपणे खणून ठेवला असून त्यावर मोठ्या प्रमाणात खडी टाकून काम अर्धवट अवस्थेतच सोडले आहे. गेल्या ७ ते ८ दिवसांपासून काम पूर्णपणे ठप्प असून, कोणत्याही प्रकारची यंत्रणा किंवा कामगार घटनास्थळी दिसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.
हा रस्ता हरिश्चंद्र पिंपरी, हरिश्चंद्र पिंपरी तांडा, चिंचवडगाव, काडीवडगाव अशा ४ ते ५ गावांसाठी जीवनवाहिनी मानला जातो. दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि लहान–मोठे व्यावसायिक या मार्गाचा वापर करतात. मात्र, सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे.
रस्त्यावर टाकलेली सैल खडी, खोल खड्डे आणि असमतोल पृष्ठभाग यामुळे वाहन चालवणे धोकादायक बनले आहे. दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे चारचाकी वाहनांचे टायर व सस्पेन्शन खराब होत आहेत रुग्णवाहिका व शाळेची वाहने वेळेत पोहोचण्यात अडचणी येत आहेत धूळ प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे विशेष म्हणजे, रस्ता खणून ठेवल्यानंतर योग्य पाणी मारणे (डस्ट कंट्रोल), साईनबोर्ड, डायव्हर्शन किंवा सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका आणखी वाढतो आहे.

### गावकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

● रस्त्याचे काम तात्काळ पुन्हा सुरू करावे ● काम पूर्ण होईपर्यंत तात्पुरती सुरक्षित व्यवस्था करावी ● दर्जेदार आणि टिकाऊ (क्वालिटी) काम व्हावे ● शासनाच्या नियमावलीनुसारच काम पूर्ण करावे ● कामात झालेल्या विलंबाची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी ● गावकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर काम सुरू झाले नाही तर रस्त्यावर आंदोलन छेडण्याचा इशारा दिला जाईल. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.



गेल्या आठ दिवसांपासून काम बंद का आहे, याबाबत गुत्तेदार किंवा संबंधित विभागाकडून कोणतीही अधिकृत माहिती दिली जात नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. "काम सुरू करून मध्येच थांबवणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळणेच," अशी तीव्र प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

# सर्व समाज बांधवांकडून रमजान ईदनिमित्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छांचा वर्षाव

## इंदिरानगरात एकात्मतेचा संदेश

**कन्नड :** कन्नड शहरातील इंदिरानगर परिसरामध्ये रमजान ईदच्या पावन निमित्ताने सर्व समाज बांधवांच्या वतीने मुस्लिम बांधवांना मन:पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. जाती–धर्माच्या पलीकडे जाऊन सामाजिक एकात्मता आणि बांधिलकी जपत येथील नागरिकांनी आपुलकीचा सुंदर संदेश दिला. या निमित्ताने इंदिरानगर म्हाडा कॉलनीत छोटेखानी पण भावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात विविध समाजातील नागरिकांनी एकत्र येत बंधुभावाचे दर्शन घडवले .रमजान ईद हा इस्लाम धर्मातील अत्यंत पवित्र सण असून, संपूर्ण महिनाभर उपवास (रोजा) ठेवून आत्मसंयम, त्याग, आणि ईश्वरप्रेमाची साधना केल्यानंतर हा सण साजरा




केला जातो. या दिवशी नमाज अदा करून एकमेकांना मिठी मारत "ईद मुबारक" म्हणत आनंद साजरा केला जातो. समाजात प्रेम, शांतता आणि बंधुभाव वाढवण्याचा हा सणाचा मुख्य संदेश आहे .या कार्यक्रमासाठी कन्नड भीम जयंती महोत्सवाचे उपाध्यक्ष राजू भाई कमिटी यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी बोलताना राजू भाई यांनी, "आपण सर्वजण एक आहोत, जाती–धर्मापेक्षा मानवता मोठी आहे. सर्वांनी एकत्र येऊन शहराच्या विकासासाठी काम करणे हीच खरी गरज आहे," असे प्रभावी मत व्यक्त केले. कार्यक्रमास इंदिरानगर म्हाडा कॉलनीतील प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ मंडळी तसेच तरुण मित्र मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसरात सौहार्द, एकोपा आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

# माजलगावात सैलानी बाबा संदल पालकी व यात्रा उरूसचे आयोजन

## भक्तांनी लाभ घेण्याचे यात्रा समितीकडून आवाहन

**माजलगाव : प्रतिनिधी**
शहराजवळील असलेल्या ढोरगाव–हिंगणवाडी शिवारात सैलानी बाबा यांचे दर्गा परिसर येथे दि .२२ मार्च रविवार रोजी सैलानी बाबा संदल व यात्रा उरूसचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ भक्तांनी घ्यावा असे आवाहन यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल गायकवाड यांनी केले आहे.



या दर्ग्याच्या दर्शनासाठी जिल्हा व राज्यभरातून विविध जाती धर्मातील भाविकांची मोठी उपस्थिती दरवर्षी असते. सकाळी ९ ते सायंकाळी १० वाजेपर्यंत भाविक भक्तांचि दर्शनासाठी आलोट गर्दी पाहायला मिळते. व तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. ढोरगाव हिंगणवाडी शिवारात असलेल्या सैलानी बाबा यांच्या दर्गायात दरवर्षी पाडव्या नंतर तीन दिवसांनी संदलचे आयोजन करण्यात येते मागील अनेक वर्षापासून ही परंपरा सुरू आहे.

मा. बाबुदादा राजेभाऊ गायकवाड यांच्या घरून दि. २२ मार्च रविवार रोजी सायंकाळी संदल बायपासने निघुन आंबेडकर चौकातून त्याच दिवशी रात्री ९ .३० वाजता सैलानी बाबांच्या दर्गा येथे पोहचते. यूसुफ कादरी, आगा खाँन साहाब, शेख महेबुब, रईस बाबा कादरी, शेख मुस्तकीम बाबा, सय्यद रफीक कादरी, पुजारी परिवाराच्या व ईतर मान्यवरांच्या हस्ते सैलानी बाबा दर्गाह येथे यावर्षी चादर चढविण्यात येणार आहे. तसेच चादर चढवल्या नंतर सुप्रसिद्ध कव्वाल तौसिफ जुनैदी पुणे यांचा शानदार कव्वालीचा कार्यक्रम होईल. तसेच संदल निमित्त्य दर्शनास सर्व जनतेने यावे असे आवाहन सैलानी बाबा यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल गायकवाड यांनी केले आहे.

# गॅस टंचाईने कन्नडकर हैराण; केवायसीच्या नावाखाली ग्राहकांची लूट?

## सिलेंडरसाठी दिवसन्‌दिवस चकरा, तर ग्रामीण भागात बेकायदेशीर वसुलीचा प्रकार उघड

**कन्नड / प्रतिनिधी :**
कन्नड शहरासह तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, या परिस्थितीत नागरिकांना दुहेरी फटका बसत असल्याचे चित्र आहे. एकीकडे सिलेंडरसाठी ग्राहकांना दिवसन्‌दिवस एजन्सीच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत, तर दुसरीकडे केवायसीच्या नावाखाली काही ठिकाणी ग्राहकांकडून बेकायदेशीर वसुली केली जात असल्याचे समोर आले आहे.

ऐन गरजेच्या वेळी अडचण येऊ नये म्हणून अनेक ग्राहक अतिरिक्त सिलेंडर साठवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. परिणामी एजन्सीवर अनावश्यक गर्दी वाढली असून खऱ्या गरजूंना रांगेत ताटकळत उभे राहावे लागत आहे. गॅस मिळविण्याची प्रक्रिया देखील किचकट झाली आहे. ग्राहकांना पहिल्या दिवशी पावती काढावी लागते, त्यानंतर दोन दिवसांनी गोडाऊनवर टाकी नेऊन नंबर लावावा लागतो. या संपूर्ण प्रक्रियेत तीन ते चार दिवस



खर्ची पडत असून दिवसभर थांबूनही खात्रीशीर सिलेंडर मिळेलच याची हमी नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. कन्नड येथील गंगासागर गॅस एजन्सीकडे तालुक्यातील सुमारे साडेचार हजार ग्राहक आहेत. मागील महिनाभरापासून टंचाई वाढल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. अशा अवस्थेत ग्रामीण भागात काही युवक–युवतींना 'मेकॅनिक' म्हणून पाठवून केवायसी अपडेट करण्याच्या नावाखाली प्रत्येकी सुमारे २५० रुपये आकारले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, केवायसी न केल्यास गॅस बंद होईल अशी भीती दाखवून ही वसुली केली जात असल्याचेही समोर आले आहे. याबाबत प्रतिनिधींनी चौकशी केली असता संबंधितांनी "एजन्सीकडूनच आम्हाला पाठवण्यात आले असून, फॉर्म भरून पैसे दिले तरच गॅस मिळेल," असे सांगितल्याचे समजते. त्यामुळे या प्रकाराबाबत नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# केज शहरातील श्रीकृष्ण आश्रम येथे चालू असलेल्या १०८ कुंडी महाविष्णू याग, संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

## ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांच्या काल्याच्या कीर्तनाला उलटला लाखोंचा जनसागर

**केज : प्रतिनिधी**
केज–बीड रोडवरील श्रीकृष्ण आश्रम येथे गेल्या बुधवार दिनांक ११ मार्चपासून चालू असलेल्या महाविष्णु याग, संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता गुरुवार दिनांक १९ मार्च रोजी ह .भ .प .रामराव महाराज ढोक यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

यावेळी केज तालुक्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक–भक्त मोठ्या संख्येने जमा झाले होते या सप्ताहाच्या सांगतेच्या वेळी ह .भ .प .रामराव महाराज ढोक यांनी यांनी श्रीकृष्ण मंदिराच्या भूमिपूजनाचे काम आता चालू होणार आहे व या मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या ठिकाणी मी कथा करणार आहे असे वचन दिले आहे.
यावेळी बोलताना ह .भ .प. रामराव महाराज ढोक यांनी येथे जमलेल्या सर्व भाविक भक्तांना आवाहन केले की, या मंदिराच्या बांधकामासाठी फुल नव्हे तर फुलाची पाकळी आपण द्यावी यावेळी महाराजांनी श्रीकृष्णाचे वर्णन सांगताना गावाचा माणूस कितीही मोठा अधिकारी झाला तरी तो गावासाठी व मित्रांसाठी आपला साधा व्यक्ती असतो. याचे कृष्णवर्णन गोकुळात कृष्ण परत आल्यानंतर गोपिका व गोपाळ यांनी आमचा कृष्ण लहानपणी गुरे चारताना कसा होता यावर ह .भ .प .रामराव महाराज ढोक यांनी सखोल असे भाविक–भक्तांना भावेल असे आपल्या कीर्तनातून सांगितले यावेळी महाराजानी श्रीकृष्ण मंदिराच्या बांधकामासाठी लागणारे सर्व स्टील (लोखंड) श्री .राजेभाऊ घुले व श्री विष्णू भाऊ घुले हे दोन भाऊ देणार आहेत.



मी गेली सात दिवस ज्यांच्या घरी वास्तव्यास होतो असे कै. नारायण बप्पा घुले यांचे चिरंजीव अनंत घुले, श्रीकांत घुले यांनी श्रीकृष्ण मंदिरासाठी ११ लाख रुपयांची देणगी जाहीर केली. या मंदिरासाठी रामराव महाराज ढोक यांनी आवाहन केल्यानंतर मंडपात जमलेल्या भाविक भक्तांनी २० मिनिटात ५ लाख ६३हजार रुपये जमा केले. यावेळी केशव महाराज शास्त्री यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, हा यज्ञ जगाच्या कल्याणासाठी केला जातो या केलेला १०८ कुंडी महायज्ञ सोहळा व संगीतराम कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते या सप्ताहाची सांगता रामराव महाराज ढोक यांनी काल्याच्या कीर्तनातून भाविकांना संदेश दिला की, आचरण रामाचे करावे तर चरीत्र कृष्णाचे उच्चारावे मागणी केल्या नंतर मिळते ते आश्वासन व न मागता मिळतो तो आशिर्वाद असे
यावेळी स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या कन्या प्रीतम ताई मुंडे व पंकजाताई मुंडे यांनी व्हिडिओ कॉल द्वारे आलेल्या सर्व भाविकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या व हा कार्यक्रम साठी आम्ही येऊ शकलो नाहीत याची दिलगिरी व्यक्त करत पुढच्या कार्यक्रमासाठी व मंदिराच्या कार्यासाठी आम्ही अवश्य भेट देऊ अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या ह .भ .प .रामराव महाराज ढोक यांनी सांगितले. बाल श्रीकृष्ण चरित्र सांगुन काल्याच्या किर्तनाची सांगता झाली.
यावेळी महाराजांनी महायज्ञासाठी साठी वापरलेल्या विटा ज्या भाविकांना आपल्या घरी घेऊन जायची असेल त्यांनी २०० रुपये देऊन मंदिराच्या बांधकामासाठी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.
यावेळी पावनधाम संस्थानचे महंत ह .भ .प .महादेव महाराज बोराडे शास्त्री, हे .भ .प .केशव महाराज शास्त्री घुले, रमेशराव आडसकर, रणजीत आडसकर, सौरव सोनवणे, रमाकांत बापू मुंडे, विष्णू घुले, सुधाकर बापु लांब, अनंतराव घुले, श्रीकांत घुले, शिवराम घुले यांच्या सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.
ह .भ .प. केशव महाराज शास्त्री यांनी सप्ताह यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले व आहेत. काल्याच्या कीर्तनाला राज्यभरातून लाखोंच्या संख्येने जनसागर लोटला होता. कार्यक्रमाची सांगता शेवटी महाप्रसादाने करण्यात आली.

# हर हर महादेवच्या जयघोषात वडवणीहून शिखर शिंगणापूरकडे पायी दिंडीचे भक्तिमय प्रस्थान

**वडवणी : अशोक फपाळ**
चैत्र एकादशीच्या पावन निमित्ताने वडवणी शहरातून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भक्तिभावाने निघणाऱ्या पायी दिंडी सोहळ्याला गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी उत्साहात प्रारंभ झाला. "हर हर महादेव"च्या गजरात वडवणीहून मोठ्या संख्येने शिवभक्तांनी शिखर शिंगणापूरकडे पायी प्रस्थान केले. या पवित्र परंपरेची सुरुवात तब्बल ४६



वर्षांपूर्वी किसन बाबा ओतारी यांनी केली होती. त्यांच्या आशीर्वादाने आजही ही परंपरा अखंड सुरू असून, दिंडीचे नियोजन गेणाबापू पाटोळे व दिनकर फड यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने केले जात आहे.
दिंडीमध्ये विविध धार्मिक प्रतीकांचे विशेष महत्त्व असून, शंभो महादेवाच्या कावडी व काठ्या भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र ठरत आहेत. यात फक्त घोडके (नाथा) यांची कावड, शिवाजी पाटोळे यांची कावड, दिनकर फड यांची काठी तसेच गोरख घोडके यांची शंभू महादेवाची काठी विशेष आकर्षण ठरत आहे. पारंपरिक वाद्यांचा गजर, अभंग, भजन आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे.
ही दिंडी सुमारे दहा दिवसांचा प्रवास करत विविध ठिकाणी मुक्काम करणार आहे.

### मुक्काम स्थळे पुढीलप्रमाणे

● चिखलबीड, एकुरका, जवळूका, भुम, शेंद्री, कदम वस्ती, टेंभुर्णी, गायकवाड वस्ती, नातेपुते आणि अंतिम मुक्काम शिखर शिंगणापूर येथे होणार आहे. या दिंडीत शेकडो शिवभक्त उत्साहाने सहभागी झाले असून, त्यामध्ये शंकर झाडे, बबन भुजबळ, सुनिल डिगे, श्रीकिसन घोडके, चैतन्य राऊत, प्रदीप पाटोळे, महादेव पंधारे, गोरख घोडके, प्रदीप घोडके, कोंडीराम गुरसाळी, विकास फड, आकाश फड, नाना अंधारे, दत्तात्रय करळे, तुकाराम चौरे, डिगांबर जाधव, रवी शिंदे यांच्यासह असंख्य शिवभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग आहे. शिस्त, श्रद्धा आणि परंपरेचा संगम असलेला हा पायी दिंडी सोहळा केवळ धार्मिक नाही, तर समाजात एकोपा, श्रद्धा आणि संस्कृती जपणारा प्रेरणादायी उत्सव ठरत आहे.